NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २१.१०.२०२६ बुधवार

दिनविशेष २१ ऑक्टोंबर – ''शहीद पोलिस स्मृति दिन''

''शुरा मी वंदिले''

भारताच्या उत्तरेला चीन देशालगत लडाख ह्या अतीउंच व अतीदुर्गम अशा जिल्ह्यातील मुख्य ठिकाण म्हणजे लेह. जे भारत–चीन दरम्यान असलेल्या मॅकमोहन रेषेजवळ व कारगील क्षेत्राजवळ असुन, ते समुद्र सपाटीपासुन अंदाजे १६,००० फुट उंचीवर आहे आणि तेथील तापमान उणे ४१ डिग्रीपर्यंत असते. १८,००० फुट उंचीला असलेल्या जागेतील खडतर अशा मार्गावर गरम पाण्याचा झरा असलेल्या हॉटस्प्रींग या ठिकाणी २१ ऑक्टोंबर १९५९ ला केंन्द्रीय राखीव पोलीस दलाचे उप निरीक्षक श्री. करणसिंग यांचे नेत्रुत्वात पोलीस कर्मचाऱ्यांचे १० जवानांची तुकडी सिमा रेषेवर डोळ्यात तेल घालुन गस्त घालत हॉटस्प्रींग पासुन ५ मैलावर पोहचले. पथकाला संशयास्पद हालचाली दिसल्याने, पथक प्रमुखाने आपल्या पथकाला आडोसा घेण्याबाबत इशारा केला. विरोधी गटाने पोलीस पथकावर स्वयंचलीत शस्त्राने गोळीबार सुरू केला. भारतीय टोळी प्रमुखाने फायर असे कडक आदेश दिल्याने पोलीसांनी गोळीस गोळीने प्रतिउत्तर दिले. चिनी सैनीकांची संख्या जास्त असल्याने व भारतीय पोलीसांजवळील शस्त्रसाठा अपुरा पडल्याने, चीनी सैनीक त्यांचेवर तुटुन पडले. अशा बिकट परीस्थीतीशी झुंज देत, भारत मातेच्या रक्षणाकरीता त्यांनी आपले बलिदान दिले.

हॉटस्प्रींग हा परीसर शहीदांच्या रक्ताने लाल होउन न्हाऊन निघाला. मात्र शेवटच्या श्वासापर्यंत पोलीस लढल्याने चीनी सैनीकांना पुढे येता आले नाही. या पथकामागुन दुसरे पोलीस पथक समोरे येत असल्याने चिनी सैन्याने माघार घेताना, या १० पोलीसांचे मृतदेह पळवुन नेले. या शहीद पोलीसांमध्ये धर्मसिंग, पुरणसिंग, नारबु लांबा, बेगराजमल, माखनलाल, ईमानसिंग, तेशरींग बोखु नार्बु, हंगजीत सुब्बा व शीवनाथ प्रताप हे होते. या शहीद पोलीसांनी भारत मातेचे रक्षण करतांना, भारत मातेच्या कुशीत शेवटचा श्वास घेतला व विरगतीला प्राप्त झाले. तेव्हा दसरा–दिवाळीच्या या शुभ पर्वावर भारतातील पोलीस दलच नव्हे, तर संपुर्ण भारतवासी हळहळले व गोडधोड फराळ करण्याऐवजी दुखवटा पाळला.

भारताकडुनच नव्हे तर जगभरातुन या प्रकरणाची निंदा झाल्याने, दिनांक १३ नोव्हेंबर १९५९ रोजी चीन देशाने १० ही सैनीकांचे छिन्न–विछिन्न मृतदेह भारताचे स्वाधीन केले. दुसऱ्या दिवशी दिनांक १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ०८.०० वाजता हॉटस्प्रींग येथे सदर मृतदेहांवर शासकीय इतमामात सन्मानपुर्वक अंत्यसंस्कार करून, त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. भारतातील सर्व पोलीसांनी स्वेच्छेने पै–पै जमा करून, या वीर बांधवांचे स्मारक हॉटस्प्रींग येथे बांधले. स्मारकाच्या चौथऱ्यावर भावपुर्ण संदेश लिहीण्यात आलेला आहे. तो असा की, "When you go home tell them of us for their tomorrow, we give up our today" **(तुम्ही घरी गेल्यावर त्यांना आमच्याबद्दल सांगा कि, त्यांच्या उद्यासाठी आम्ही आमचा आज अर्पण केला आहे.**

भारताच्या या वीर जवानांनी दाखविलेल्या या अतुलनीय शौर्यापासुन आम्हा सर्वाना स्फुर्ती मिळावी तसेच, आपल्या कर्तव्याशी व राष्ट्रनिष्ठेची जाणीव राहावी, म्हणुन **२१ ऑक्टोंबर हा दिवस ''पोलीस स्मृती दिन''** म्हणुन

पाळण्यात येतो. या दिवशी भारतात वर्षभरात कर्तव्य करीत असतांना हुतात्म्य पत्करणाऱ्या पोलीस जवानांच्या नावांचे वाचन करून, त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येते. पोलीस परेड मैदानावर त्यांच्या स्मृती प्रीत्यर्थ हवेत बंदुकीच्या फैरी झाडुन व बंदुकीने शोक सलामी देवुन, दोन मिनीटांचे मौन धारण करून पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात येते.

आजचा दिवस पोलीस प्रशासनाकरीता अत्यंत महत्वाचा दिवस आहे. या वर्षी देखील संपुर्ण भारतातुन १५३ पोलीस अधिकारी/अंमलदारांनी कर्तव्य बजावीत असतांना आपल्या प्राणांची आहुती दिलेली आहे.

नागपुर शहर पोलीस आयुक्तालय व नागपुर शहरातील इतर पोलीस घटकांचे संयुक्त विद्यमाने आज बुधवार दिनांक २१ ऑक्टोंबर २०२६ रोजी सकाळी ०८.०० वाजता, नागपुर शहर पोलीस मुख्यालय येथील शहीद स्मारक येथे पोलीस हुतात्मा दिवस कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाकरिता, प्रमुख अतीथी मा. न्यायमुर्ती श्री. अनिल किलोर, प्रशासकीय न्यायमुर्ती, मुंबई उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ हे उपस्थित होते. मा. प्रमुख पाहुणे त्याचप्रमाणे, मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो. दल, नागपुर श्री. निसार तांबोळी, मा. पोलीस महानिरीक्षक नागपुर परीक्षेत्र श्री. संदीप पाटील, मा. अपर पोलीस आयुक्त नागपुर शहर (उत्तर प्रभाग) मा. श्रीमती विनीता शाहु, (दक्षीण प्रभाग) श्री. वसंत परदेशी, (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. पोलीस अधिक्षक महामार्ग, नागपुर श्री. लोहीत मतानी, मा. समादेशक, रा.रा. पो. गट क्र. ४, नागपुर श्री. बच्चनसिंग, मा. पोलीस अधिक्षक (लोहमार्ग) श्री. मंगेश पोपट शिंदे, मा. पोलीस अधिक्षक (कारागृह) नागपूर श्री. वैभव आगे, मा. पोलीस अधिक्षक, बिनतारी संदेश नागपुर शहर श्री. सुनिल सावंत, मा. पोलीस उपायुक्त, नागपुर शहर श्रीमती अन्नपुर्णा सिंग, श्रीमती रश्मीता राव, श्री. नित्यानंद झा, श्रीमती महेक स्वामी, आदीत्य मिरखेलकर, श्री. रमेश धुमाळ, डॉ. संदीप पखाले, श्री. राहुल माकणिकर, मा. अती. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण श्री. अनिल मस्के, मा. अती. पोलीस अधिक्षक (कारागृह) नागपूर श्रीमती दिपा आगे तसेच, नागपुर शहर चे सर्व मा. सहायक पोलीस आयुक्त आणि सर्व पो. ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक त्याचप्रमाणे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, पोलीस स्टाफ व उपस्थित नागरीकांनी सुद्धा हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र व पुष्प अर्पण करून, श्रद्धांजली अर्पण केली.

मानवंदनेसाठी नागपुर शहर पोलीस दल, नागपुर जिल्हा ग्रामीण पोलीस दल, नागपुर लोहमार्ग पोलीस तसेच, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ असे प्रत्येकी ०१ याप्रमाणे एकुण ०४ पथकातील एकुण १२० जवानांनी व बॅण्ड पथकाने सहभाग घेतला. मानवंदना परेडचे संचालन पोलीस मुख्यालय नागपुर शहरचे राखीव पोलीस निरीक्षक श्री. विनोद तिवारी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हे मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. नरेन्द्र हिवरे यांनी केले. तसेच, सहा. पोलीस आयुक्त श्री. शिवप्रसाद पारवे व पोलीस निरीक्षक श्री. अरूण क्षिरसागर यांनी देशभरातील एकुण १५३ अधिकारी व जवान या हुतात्म्यांच्या नावांचे वाचन केले.







(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २०.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ३१ केसेसमध्ये ३१ ईसमावर कारवाई करून एकुण १,५८,१४५ /–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून एकुण २,५६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ७७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ८७ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये २१ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये २३५ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०९ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०३ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८५६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०९ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ०४ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,३८७ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १,०७,५००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

पोलीस ठाणे ईमामवाडा :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २१.१०.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, ईमामवाडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळाली की, कापला वस्ती, सन्नी चव्हाण चे घरासमोर एक कत्थ्या रंगाचा शर्ट व दुसरा लाल रंगाचा टि—शर्ट व काळा जिन्स पॅन्ट घातलेले दोन ईसम शस्त्रासह फिरत आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचे दोन्हीही ईसम दिसल्याने त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) विक्की सिताराम दाभाडे, वय २८ वर्षे, २) साहील संजु डिक्का, वय २३ वर्षे, दोन्हीही रा. कापला वस्ती, ईमामवाडा, नागपुर असे सांगीतले. त्यांची अंगझडती घेतली असता, क्र. १ चे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी तलवार किंमती ५००/— रू. ची व क्र. २ चे कंबरेत पॅन्टचे आंत एक स्टीलचा चाकु किंमती १००/—रू. चा मिळुन आल्याने, दोन्हीही शस्त्रे जप्त करण्यात आली.

आरोपी हे कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार व चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोउपनि. अजय कव्हर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे आरोपींविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का., सहकलम ३(५) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे गणेशपेठ :— दिनांक २१.१०.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, वर्धमान बॅकेसमोर दालमिया बिल्डींगखाली, गंजीपेठ, नागपुर येथे एक अनोळखी ईसम वय अंदाजे ५५ वर्षे वयाचे, आजारी व बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी नामे बंटी गणपतराव हरणे, वय ४३ वर्षे, रा. ज्योती नगर, खदान, तहसिल, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. आशिष जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश—१२ साहेब, नागपुर.	७८०/२०२५	कलम १३७(२), ८७, ६४(२), १४३(४), ३(५) भा.न्या.सं., सहकलम ३(१)(w)(i), ३(१)(w)(ii), ३(२)(v)(va)	दुर्गाबाई गणपत कोवाड, वय ५५ वर्षे, रा. प्लॉट नं. ४४, एकता नगर, शिवमंदीर जवळ, पारडी, नागपुर.	२९.१०.२०२६

			अनुसुचित जाती जमाती प्रतीबंधक कायदा, सह कलम ४, ६, ८ , १२ पोक्सो ॲक्ट, सहकलम १० बाल विवाह प्रतीबंधक कायदा.		
२	मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०४०२८९/ २००५	कलम ३८१ भा. दं.वि.	हेमंत यशवंत कोवे, वय २२ वर्षे, रा. नविन फुटाळा, अमरावती रोड, बैटवार चे घराजवळ, अंबाझरी, नागपुर.	२६.१०.२०२६

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.